गंभीर आजारपणातही आनंदी रहाणारे सनातन संस्थेचे

# ज्ञानयोगी साधक श्री. शिरीष देशमुख

(श्री. देशमुख यांचा साधनाप्रवास व त्यांचे ज्ञानयोगाविषयी विचार)

## विषयसूची


१. श्री. शिरीष लक्ष्मणराव देशमुख यांचा परिचय ६

२. ग्रंथाचे संकलक, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय ७

३. ग्रंथाचे मनोगत ९

४. ग्रंथातील काही संबोधने आणि उपाधी यांविषयीची स्पष्टीकरणे ११


## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)


**प्रकरण १. श्री. शिरीष देशमुख यांचा साधनाप्रवास** १२

१ अं. सनातन संस्थेशी संपर्क २०

१ क. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्याशी झालेली प्रथम भेट आणि त्यांच्या संदर्भातील संस्मरणीय आठवणी ! २१

१ ख. श्री. देशमुख यांचा ‘एक व्यावसायिक ते पूर्णवेळ साधक’ असा झालेला प्रवास ! २४

१ फ. श्री. देशमुख रुग्णाईत झाल्यावर त्यांचे साधनेला पूरक असलेले विचार ५२

**प्रकरण २. श्री. शिरीष देशमुख यांनी परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्याशी झालेल्या भेटीत व्यक्त केलेले ज्ञानमार्गी विचार** ५७

२ उ. श्री. देशमुख यांच्या तोंडवळ्यावरील आनंद पाहून परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी ‘तोंडवळा हा मनाचा आरसा असतो’, असे म्हणणे ६०

२ ऐ. श्री. देशमुख यांना ‘परात्पर गुरु डॉ. आठवले, आत्मा आणि परमात्मा एकच आहेत’, असे वाटणे ६२

**प्रकरण ३. श्री. शिरीष देशमुख यांची ६२ टक्के आध्यात्मिक पातळी घोषित केल्याचा सोहळा** ६९

३ इ. श्री. देशमुख यांच्याविषयी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांनी काढलेले कौतुकोद्‌गार ! ७३

**प्रकरण ४. श्री. शिरीष देशमुख यांनी ६२ टक्के आध्यात्मिक पातळी गाठल्यानंतर कु. मधुरा भोसले यांनी केलेले सूक्ष्मातील परीक्षण** ७४

४ इ. श्री. देशमुख यांचे ‘वर्ष २०१४ मध्ये ५१ टक्के आध्यात्मिक पातळी असतांनाचे छायाचित्र’ आणि ‘त्यांची ६२ टक्के आध्यात्मिक पातळी घोषित झाल्यानंतरचे छायाचित्र’ पाहून केलेले सूक्ष्मातील परीक्षण ७६

**प्रकरण ५. श्री. शिरीष देशमुख यांची साधकांना जाणवलेली गुणवैशिष्ट्ये** ८०

**प्रकरण ६. श्री. शिरीष देशमुख यांच्यामध्ये साधकांना जाणवलेले पालट** ८८

**प्रकरण ७. श्री. शिरीष देशमुख यांनी लिहिलेली ज्ञानयोगाची प्राथमिक ओळख** ८९

७ उ. साधकामध्ये ज्ञानमार्गानुसार साधना करण्याची योग्यता येण्यासाठी आवश्यक गुण आणि लक्षणे ९४

**प्रकरण ८. श्री. शिरीष देशमुख यांचे पू. अनंत आठवले यांनी लिहिलेल्या ‘गीताज्ञानदर्शन’ अन् ‘अध्यात्मशास्त्राच्या विविध अंगांचा बोध’ या ग्रंथांविषयीचे विचार** १०४

८ इ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे मार्गदर्शन आणि पू. अनंत आठवले लिखित ग्रंथांचे वाचन यांमुळे ज्ञानयोगाच्या अभ्यासास आरंभ होणे १०६

**प्रकरण ९. श्री. शिरीष देशमुख यांना आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती** ११०

## विषयसूचीतील क्रमांक ३

# ग्रंथाचे मनोगत

‘साधकाने गतजन्मांत ‘कोणत्या मार्गाने साधना केली आहे ?’, तसेच ‘त्याची पिंडप्रकृती कशी आहे ?’ यांनुसार त्याचा या जन्मीचा साधनामार्ग ठरतो. सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमातील साधक श्री. शिरीष देशमुख यांची पिंडप्रकृती ज्ञानमार्गी आहे. सप्टेंबर २०२१ पासून ते ‘दोन्ही मूत्रपिंडे निकामी होणे’ या गंभीर आजाराने पीडित आहेत. जानेवारी २०२२ मध्ये माझी त्यांच्याशी भेट झाली. एवढ्या आजारपणातही ते पुष्कळ आनंदी वाटले. त्यामुळे मी न रहावून त्यांच्याकडून त्यांच्या मनाची स्थिती, त्यांची साधना, सेवा इत्यादींविषयी जाणून घेतले.

या भेटीतून माझ्या लक्षात आले की, आजारपणाच्या काळात त्यांची ज्ञानयोगानुसार उत्तम साधना झाली. त्यामुळे स्वतःच्या देहाकडे साक्षीभावाने पहाता येणे, मायेतील गोष्टींचे आकर्षण न वाटणे, ‘मी परमात्म्याचाच अंश आहे’, याची जाणीव असणे इत्यादी ते अनुभवत आहेत. त्यांच्या आनंदी रहाण्याचे हे गमक मला उलगडले. आगामी आपत्काळ महाभीषण असणार आहे. रोगराई, नैसर्गिक आपत्ती, महायुद्ध इत्यादी संकटांचा कहर होणार आहे. अशा परिस्थितीत मनाने स्थिर आणि शांत राहून दुःखांकडेही साक्षीभावाने पहाणाऱ्यालाच जीवन जगणे सुसह्य होणार आहे. या दृष्टीने साधकांना ‘श्री. देशमुख यांनी आजारपणात केलेल्या प्रयत्नांचा आपत्काळात, तसेच एरव्हीही पुष्कळ लाभ होईल’, यात शंका नाही. यासाठी ही माहिती प्रस्तुत ग्रंथात दिली आहे.

श्री. देशमुख यांच्याशी झालेल्या भेटीत त्यांचा ‘ज्ञानयोग’ या साधनामार्गाविषयीचा व्यासंगही माझ्या लक्षात आला. ज्ञानयोगाविषयीची सूत्रे त्यांना आतूनच स्फुरतात, म्हणजेच ती केवळ पुस्तकी माहिती नसून ईश्वरच त्यांना ते ज्ञान देतो. ही त्यांना त्यांच्या साधनामार्गातील मोठी अनुभूतीच येत आहे.

प्रत्येक साधनामार्गाची काही ना काही वैशिष्ट्ये असतात. प्रत्येकाचा साधनामार्ग भिन्न असला, तरी प्रत्येकाने अन्य साधनामार्गांतील स्वतःला उपयुक्त असणारी वैशिष्ट्ये आत्मसात् केल्यास त्याची साधना अधिक चांगली होण्यास साहाय्य होते. श्री. देशमुख यांनी यासंदर्भात केलेले ज्ञानयोगाविषयीचे विवेचनही या ग्रंथात दिले आहे.

श्री. देशमुख जानेवारी १९९८ पासून सनातन संस्था सांगत असलेला साधनामार्ग 'गुरुकृपायोग' यानुसार साधना करत आहेत. नोव्हेंबर २०१३ पासून ते पूर्णवेळ सनातनच्या रामनाथी आश्रमात राहून सेवा आणि साधना करत आहेत. गुरुकृपायोगामध्ये कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग या तिन्हींचा सुयोग्य समन्वय साधला आहे. त्यामुळे श्री. देशमुख यांची ज्ञानयोगाप्रमाणेच कर्म आणि भक्ती या साधनामार्गांनुसारही साधना झाली आहे. तिन्ही योगमार्गांनी साधना झाल्यामुळे त्यांची अध्यात्मात शीघ्र उन्नती होऊन त्यांनी ६२ टक्के आध्यात्मिक पातळी गाठली आहे. या ग्रंथात श्री. देशमुख यांचा 'एक व्यावसायिक ते एक पूर्णवेळ साधक', असा साधनाप्रवास त्यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून उलगडला आहे. साधकांनी श्री. देशमुख यांच्याविषयी लिहून दिलेली अनेक गुणवैशिष्ट्येही या ग्रंथात दिली आहेत. ही गुणवैशिष्ट्ये त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीची निर्देशक आहेत.

'श्री. देशमुख यांचा आदर्श ठेवून सर्व साधकांनीही साधनेचे प्रयत्न करून लवकरात लवकर आध्यात्मिक उन्नती प्राप्त करून घ्यावी', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !'

**– (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले, ग्रंथाचे संकलक (९.२.२०२२)**

F (DW-SOShiDe + PR 28Sa)

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.